सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : ३८
■ पाने : ४
■ मूल्य : ३ ₹

संपादक : घनश्याम पाटील

Website :www.chaprak.com



KaMant masale

एकदा वापरून पहाच!

किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले

संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्ट्स् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००

Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com


■ सोमवार, दि. १२ ते १८ ऑक्टोबर २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 14/10/2015

# बावधन बुद्रुक समस्यांच्या विळख्यात

## ■ कचऱ्याचे साम्राज्य; तीन आठवड्यात एकदा पाणी

**पुणे, (तुषार उथळे पाटील यांजकडून) :** चांदणी चौकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या बावधन बुद्रुक येथील रहिवाश्यांना अनेक मुलभूत समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तब्बल तीन आठवड्यात एकदा पिण्याचे पाणी येत असून, कचरा आणि राम नदीच्या पात्रातील घाणीमुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दीड वर्षापूर्वी बावधन गावात दिवसाआड पाणी यायचे; मात्र आता तीन आठवड्यात एकदाच पाणी येत असल्याने प्रचंड हाल होत आहेत. वर्षात जेमतेम १५-१६ वेळा पाणी येऊनही वर्षभराचे पाणीपट्टी बील मात्र भरावे लागते.



स. नं. २३ येथील गायरान जागेत मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. शेजारचे व्यावसायिकही त्यांचा कचरा येथेच आणून टाकतात. त्यात पावसाचे पाणी साचल्याने प्रचंड दुर्गंधी निर्माण होते. सभोवताली कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले असतानाच रामनदीच्या उगमापासून त्यात ड्रेनेजचे पाणी सोडले जाते. त्यामुळे नदीचे अक्षरशः गटार झाले आहे. बावधन, भूगाव येथील अशुद्ध पाणी मोठ्या प्रमाणात राम नदीत सोडले असतानाही त्यातच कपडे धुणे, जनावरं धुणे असे प्रकार केले जातात. पिण्याच्या पाण्याबरोबरच सांडपाण्याचेही दुर्भिक्ष्य असल्याने या प्रकारांना आळा घालणे शक्य होत नाही.

कचऱ्यामुळे निर्माण झालेले डास आणि अधूनमधून येणारे पाणीही दुषित असल्यामुळे रहिवाश्यांना त्वचेचे रोग, फ्ल्यू आणि डेंग्यूसारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. बावधन मधील रस्त्यावरचे दिवेही (स्ट्रीट लाईट) अपवादाने आणि अपघातानेच कधीतरी चालू असतात. विजेचा लपंडावही कायम सुरूच असतो. गावठाणाबरोबरच सोसायट्यांनाही पाणीपुरवठा केला जात नाही. गावातील अंतर्गत रस्ते कायम काही ना काही कारणाने खोदले जातात.

दुर्दैव म्हणजे बावधन बुद्रक समस्यांच्या विळख्यात असताना परिसरातील 'कार्यसम्राट सरपंच', 'कार्यक्षम ग्रामपंचायत सदस्य' असे जागोजागी लागलेले फलक मात्र या परिसरातील लोकांच्या जखमेवर मीठ चोळतात. गावात ग्रामसभा होत नाहीत आणि झाल्याच तर ग्रामपंचायत सदस्य केवळ 'सह्याजी'रावाच्या भूमिकेत असतात असा ग्रामस्थांचा दावा आहे.

बावधन मधील या समस्यांबाबत तहसीलदार, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त या सर्वांना वेळोवेळी निवेदने देण्यात आली; मात्र त्यावर काहीच कारवाई झाली नाही. गावच्या कारभाऱ्यांचे कमजोर नेतृत्व आणि प्रशासनाचा हलगर्जीपणा यामुळे रहिवाश्यांना मात्र अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

राम नदी सुधारयोजनेच्या अनेकांनी गप्पा मारल्या. प्रत्यक्षात मात्र नदीपात्रातील अतिक्रमणे वाढतच चालली आहेत. सर्व नियम धाब्यावर बसवून ग्रामपंचायतीने नदीपात्रात बांधकामाला परवानगी दिल्याने राम नदीचा ओढा झाला आहे. पाण्याचे प्रवाह थांबविल्याने भविष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. मात्र 'चमकोगिरी' करणाऱ्यांना त्याचे काहीच वाटत नाही. खासदार सुप्रिया सुळे यांच्या मतदार संघातील हा भाग विकसित होत असतानाही अनेक समस्यांना सामोरा जात आहे. टोलेजंग इमारती आणि त्यातून मिळणारे कोट्यवधीचे उत्पन्न म्हणजेच विकास असा काहींचा समज झाल्याने लोकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे.


## भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे :** दत्तवाडीमधील विठ्ठल हनमघर फाऊंडेशनच्यावतीने स्व. विठ्ठल हनमघर यांच्या चतुर्थ स्मरणार्थ दिनानिमित भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ४३८ पिशव्या रक्तसंकलित करण्यात आले. दत्तवाडीमधील एस. एस. अग्रवाल शाळेमध्ये झालेल्या शिबिराचे उद्घाटन महापालिका सभागृह नेते शंकर उर्फ बंडू केमसे यांच्याहस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी खासदार वंदना चव्हाण, आ. जयदेवराव गायकवाड, अंकुश काकडे, विठ्ठल हनमघर फाऊंडेशनचे कार्याध्यक्ष नगरसेवक विनायक हनमघर, अध्यक्ष आनंद रिठे, नगरसेवक विकास दांगट, रुपाली चाकणकर, गणेश घोष, धीरज घाटे, दयानंद इरकल, नगरसेवक दिनेश धाडवे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्रीधर जाधव, पोलीस निरिक्षक स्मिता जाधव, पोलीस निरिक्षक दत्ताजीराव मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

## झलक - 'साहित्य चपराक' दिवाळी विशेषांक २०१५

### ध्येय अमुचे हे ठरले; कार्य दुसरे ना उरले! अर्थात पुरोगामी चळवळीचे मारेकरी!!

लोकसभा निवडणुका संपून आता दीड वर्षाचा कालावधी उलटला आहे आणि त्यात नरेंद्र मोदी यांनी भाजपाचे नेतृत्व करताना काँग्रेसचा ऐतिहासिक पराभव घडवून आणला. नुसता त्या पक्षाचा तो पराभव नव्हता तर स्वातंत्र्य चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय क्षितीजावर तळपत असलेल्या नेहरू-गांधी प्रणित तथाकथित सेक्युलर वा पुरोगामी विचारसरणीचा तो दारूण पराभव होता. मात्र इतके होऊनही अजून कोणी त्याचा गंभीरपणे अभ्यास केलेला नाही; किंबहुना त्या निकालांची गंभीर दखलसुद्धा घेतली गेलेली नाही. उलट जुनेपाने संदर्भ देवून अशा पराभवातून काँग्रेस अनेकदा कशी सावरली आहे, त्याचे दाखले देण्याची पळवाट शोधण्यात जाणत्यांनी धन्यता मानलेली आहे. इथे 'जाणते' म्हणजे फक्त काँग्रेस पक्षातले जाणते व अभ्यासू नेते असेच म्हणायचे नाही; तर स्वत:ला राजकीय विश्लेषक वा पुरोगामी विचारांचे समर्थक मानल्या जाणाऱ्या पत्रकार-संपादक व लेखकांचाही त्यामध्ये समावेश आहेच! पण त्याच्याही पलीकडे जे अन्य पुरोगामी पक्ष वा संघटनेशी संबंधित आहेत, त्यांचाही याच जाणत्यांमध्ये समावेश होतो. अशा तथाकथित तमाम पुरोगाम्यांनी मोदींचा विजय केवळ निवडणुकीतला विजय मानून त्याकडे केलेला कानाडोळा त्यांच्या बेफिकीरीचे लक्षण नाही, तर बौद्धिक दिवाळखोरीची साक्ष आहे.



**भाऊ तोरसेकर यांचा विशेष लेख.**

### दिवाळी विशेषांक २०१५ चे मानकरी

महाराष्ट्र भूषण बाबासाहेब पुरंदरे, भाऊ तोरसेकर, ह. मो. मराठे, नागनाथ कोत्तापल्ले, प्राचार्य प्र. चिं. शेजवलकर, डॉ. न. म. जोशी, प्रा. मिलिंद जोशी, अरुण खोरे, संजय सोनवणी, अंजली कुलकर्णी, डॉ. विद्या देवधर, ज्योती कदम, सुवर्णा जाधव, वासुदेव कुलकर्णी, डॉ. श्रीपाल सबनीस, सदानंद भणगे, डॉ. सच्चिदानंद शेवडे, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. भास्कर बडे, पराग करंदीकर, श्रीपाद ब्रह्मे, विकास पाटील, श्रीनिवास वारुंजीकर, श्रीराम पचिंद्रे, स्वप्निल पोरे, समीर नेर्लेकर, चंद्रलेखा बेलसरे, प्रा. द. ता. भोसले, सुधीर जोगळेकर, उमेश सणस, स्वाती तोरसेकर, मनीषा वाणी, माधव गिर, आसावरी इंगळे, महेश मांगले, प्रशांत चव्हाण, पराग पोतदार, अशोक कुळकर्णी, प्रदीप नणंदकर, प्रल्हाद दुधाळ, सरिता कमळापुरकर, शेखर जोशी, विनोद श्रा. पंचभाई, मच्छिंद्र कामंत, सतीश देशपांडे, प्रा. बी. एन. चौधरी, प्रशांत जोशी, डॉ. रेणुकादास बारबिंड, सागर कळसाईत, डॉ. मुग्धा जोर्वेकर, नागेश शेवाळकर, विलास सिंदगीकर, मेनका धुमाळे, शांताराम डफळ, वसंत बंदावणे, रामदास केदार, रवी घाटे, अशोक जाधव, नरेंद्र नाईक, बबन मिंडे आणि इतर....

# पुरूषी मानसिकतेवर प्रहार करत 'बाईची भाईगिरी'

'मी माझी झाशी देणार नाही' असे ब्रिटिशांना ठणकावून सांगणारी रणरागिणी या राष्ट्राने पाहिली. सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाची कवाडे सताड उघडी करून दिली आणि स्त्री शिक्षणाची अद्भूत क्रांती झाली. प्रत्येक क्षेत्रात आपल्या महिलांनी अव्वल स्थान मिळवले. त्यांच्या नेत्रदिपक यशाने स्त्री-पुरूष समानतेचा संदेश रूजला. कोणत्याही क्षेत्रात स्त्रिया पुरूषांपेक्षा कमी नाहीत, हे अनेकींनी त्यांच्या कृतीतून सिद्ध केले. इतकेच काय, अनेक सिनेमात बायका धडधाकट पुरूषांना बडवून काढतात असे प्रसंगही सर्रासपणे दाखवले जाऊ लागले. पुरूषी मानसिकता संपून स्त्रियांना खऱ्याअर्थी पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याचे हे लक्षण आहे.

बिल क्लिंटन हे जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. रॉजर स्टोन हा त्यांचा राजकीय सल्लागार. क्लिंटन यांनी अनेक गुण उधळले असल्याचा रॉजर हा साक्षीदार. या रॉजरने अलीकडेच 'द क्लिंटन वॉर ऑन वूमन' हे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने अनेक गौप्यस्फोट केले आहेत. त्यातला महत्त्वाचा संदर्भ म्हणजे, बिल क्लिंटन हे त्यांची बायको हिलरी क्लिंटन यांचा नित्यनेमाने मार खायचे. अनेक छोट्या-मोठ्या गोष्टीवरून हिलरी त्यांना बदडून काढत आणि तेही हिलरीच्या हातचा प्रसाद निमुटपणे सहन करत. रॉजर स्टोन याने दिलेल्या या संदर्भामुळे चर्चेला ऊत आला आहे.

बाहेरच्या राष्ट्राचे सोडा, आपल्याकडे अनेक नवनव्या अभिनेत्री सांगतात की, कथेची गरज असेल आणि निर्मात्यांनी आम्हाला सांगितले तर आम्ही नग्न दृश्य द्यायलाही तयार आहोत. कौटुंबिक, सामाजिक बंधने झुगारून देत आजच्या मुली, बायका त्यांच्या करिअरसाठी, त्यांच्या छंदासाठी, त्यांच्या कर्तव्यासाठी वाटेल ते करायला तयार असतात. आपल्याकडे अनेक उत्तम प्रशासन कौशल्य असलेल्या महिला राज्यकर्त्या झाल्या. त्यांनी त्यांच्या क्षेत्रात दखलनीय काम केले. हिंदुस्थानच्या तर पंतप्रधान पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत महिलांनी मुसंडी मारली. त्या कुठेही, कशालाही कमी पडल्या नाहीत. प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, सहकार, चित्रपट, राजकारण, संशोधन, उद्योग अशा सर्व क्षेत्रात अनेक महिलांनी देदीप्यमान कार्य केले. कुटुंबाचा गाडा हाकत असतानाच त्यांनी राष्ट्राच्या विकासातही मोठे योगदान दिले. त्या सर्व महिलांचा आम्हाला अभिमानच वाटतो.



महिलांच्या या सर्व योगदानाचा अनेकांनी आपापल्या परीने गौरवच केला आहे. सर्व बंधने झुगारून देणाऱ्या, परिस्थितीला सामोरे जाऊन मार्ग काढणाऱ्या, समाजगाडा सुरळीत चालावा यासाठी योगदान देणाऱ्या या महिला पाहिल्या की आमचाही उर अभिमानाने भरून येतो. सकारात्मक, विधायक आदर्शांचा डोंगर उभा करणाऱ्या महिला जशा आम्ही पाहिल्या तशाच नकारात्मक कार्याचे शिखर गाठणाऱ्या महिलाही जागोजागी दिसून येतात. 'बाईची भाईगिरी' हा विषय सिनेमापुरता मर्यादित राहिला नसून तो आजूबाजूला सर्वत्र आणि सर्रासपणे दिसून येतो.

असे म्हणतात की, साहित्याचे प्रतिबिंब समाजजीवनात उमटते. समाजाला दिशा देण्याचे मोलाचे कार्य साहित्य करते. आपल्याकडील साहित्य संस्थानी त्यासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा असते. अनेक कवयित्रींनी, लेखिकांनी त्यासाठी भरीव योगदान दिले आहे. बहिणाबाई चौधरी यांच्यासारख्या कवयित्रीच्या कविता लोकजीवनाचा एक भाग बनला. साहित्याचे नेतृत्व करण्याचा ठेका घेतलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी सध्या माधवी वैद्य नावाच्या एक विदूषी कार्यरत आहेत. फारसे साहित्यिक योगदान नसताना, एकही पुस्तक प्रभावीपणे वाचकांपर्यंत पोहोचलेले नसताना, इतरांच्या पुस्तकावर लेखन आणि इतरांच्याच जीवनावरचे कार्यक्रम सादर करणाऱ्या या बाई तशा खमक्या आहेत. साहित्य आणि संस्कृती क्षेत्रातील भल्याभल्यांना त्यांनी गारद केले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्ष असलेल्या या बाईंनी अध्यक्षांवरही दबाव आणला. त्यांना उपेक्षित ठेवून सर्वत्र

**संपादकीय**
**घनश्याम पाटील - ७०५७२९२०९२**

मिरवण्याची हौस भागवून घेतली. आता त्यांचा कालावधी संपत आलेला असताना आणि महामंडळाचे कार्यालय पुण्यातून नागपूरला स्थलांतरीत होत असताना त्यांना काही नवे शोध लागले आहेत. त्यातून त्या स्वत: काही बोध मात्र घेणार नाहीत.

कोणते आहेत हे शोध? तर महामंडळाच्या अध्यक्षा म्हणतात की, त्यांना पुरूषी मानसिकतेतून त्रास दिला जातोय! ८६ वर्षीय अध्यक्ष डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांचा बोलवता धनी वेगळा असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केलाय. व्यवस्थापन क्षेत्रात मानदंड ठरणारे आणि उत्तम प्रशासकीय कौशल्य असणारे डॉ. शेजवलकर हे अनेकांसाठी आदर्शवत आहेत. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान प्रचंड आहे. अशा साहित्यातील अधिकारी आणि दांडगे योगदान असणाऱ्या सत्पुरूषाकडून 'पुरूषी' मानसिकता दाखवत त्रास दिला जात असल्याचा हास्यास्पद आरोप वैद्य बाईंनी केला आहे. त्यांना जवळून ओळखणाऱ्या अनेकांना या चोराच्या उलट्या बोंबा वाटतात.

माधवी वैद्य यांच्यावर वेळोवेळी अनेक गंभीर आरोप झाले. त्या सूडाचे राजकारण करतात असे आक्षेप घेतले गेले. मात्र त्या कशाचेही उत्तर त्यांनी कधीही दिले नाही. पाणी नाकापर्यंत आल्यानंतर माकडीण ज्याप्रमाणे आपल्या पिल्लाला पायाखाली घेते त्याप्रमाणे वैद्यबाई अडचणीत आल्यानंतर आता त्यांच्या जवळच्या लोकांना त्यात गोवण्याचा प्रयत्न करत आहेत. डॉ. शेजवलकर यांच्यावर अनाठायी आरोप करून त्यांनी ते सूचित केले आहे.

सर्व क्षेत्रातील महिलांची उजळती प्रतिमा पाहता साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष बाईंनी ती डागाळण्याचे काम केले आहे. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली असेल तर त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी पत्रकार परिषद घेऊन पुरूषी मानसिकतेवर प्रहार करण्याचा असंस्कृतपणा त्यांनी दाखवला आहे. साहित्य संस्थातील विकृत मनोवृत्तीचे हे प्रतिबिंब आहे. ज्यांचा साहित्याशी कसलाही संबंध नाही ते लोक साहित्य संस्थात सक्रिय झाल्यानंतर दुसरे काय होणार? नवीन पिढीला साहित्याशी जोडून घेण्याऐवजी साहित्य संस्थातील पदाधिकारी असे वर्तन करत असतील आणि अंतर्गत हेव्यादाव्यातून, आरोप-प्रत्यारोपातून, शह-काटशहाच्या आणि सूडाच्या भावनेतून असे राजकारण करत असतील तर मराठी भाषेच्या दृष्टिने ते सर्वाधिक मारक ठरेल, हे मात्र नक्की! ■■

## 'झाड'


हवी असेल सावली तर
लावलंच पाहिजे झाड
व्याप असू दे कितीही
जराशी सवड काढ

झाडे जगली तरच
जगेल मानवजात
म्हणून झाडे लावायला
यावेत लाखो हात

अविचाराने झाडांना
असाच माणूस कापेल
शांत असलेली पृथ्वीही
एकाएकी तापेल !



## 'झाडाचे बोल'



पानगळीचा ना कंटाळा
म्हणे मला तो वृक्ष
पुन्हा नव्याने बहर येतसे
याची तर ती साक्ष !

डवरून येईन पुन्हा नव्याने
नवी पालवी अंगी
पुन्हा रंगतील पक्षी सारे
हिरवाईच्या रंगी

समूळ जोवर जात नाही मी
घ्या रे घ्या सावली
कडक उन्हातून याच मजकडे
घाईच्या पाऊली !

देणे हा तर धर्मच माझा
कशास लाजू देण्या
फक्त फुलू द्या तुमच्यासाठी
सदैव हिरव्या लेण्या

■ मुरारीभाऊ देशपांडे
संगमनेर
९८२२०८२४९७




## मासिक साहित्य चपराक
ऑक्टोबर २०१५

- दुष्काळग्रस्तांच्या मदतीला पुणेकरांची धाव!/ **घनश्याम पाटील**
- मलमपट्टी नाही, व्यापक कार्यक्रम करणार/ **मकरंद अनासपुरे**
- अशी माणसं, असे ऋणानुबंध / **महेश मांगले**
- रद्दीतून ११२ विद्यार्थी बुद्धिकडे / **प्रसाद प्रभू**
- सात्विक प्रतिभावंत पंढरीनाथ कोल्हापुरे / **चंद्रलेखा बेलसरे**
- रेघोट्यांच्या प्रदेशात / **समीर नेर्लेकर**
- सणवार, व्रतवैकल्य आणि आपण / **आसावरी इंगळे**
- आठवणीतील पाने / **संजय वाघ**
- जागर महापुरुषांचा / **अरुण कोटगी-बेनाडीकर**
- सम्राट चंद्रगुप्त मौर्य / **संजय सोनवणी**
- संघर्ष (कथा) / **मनिषा वाणी**
- **ग्रंथ परिचय**
  सोळा भाषणे : महेश मांगले — बाळासाहेब एक अंगार : उद्धव भयवाळ
  माणिकमोती : महादेव कोरे — गावमाती : विकास पांढरे
- **काव्यपुष्प**
  सविता करंजकर, धाराशिव — मुरारीभाऊ देशपांडे, संगमनेर — विनिता कुलकर्णी/पाटील
  रमेश पां.जाधव, पुणे — अशोक भांबुरे, पुणे — भालचंद्र कोळपकर, नान्नज
  महेश मांगले, पुणे — विद्या बयास, शिरुर ताजबंद — संध्या देशमुख, पुणे

**वार्षिक वर्गणी रु. ५०० फक्त**
**संपर्क : ०२० २४४६०९०९**

# साहित्य आखाडा-मी

***सध्या*** साहित्य अकादमी पुरस्कार नेहमीपेक्षा वेगळ्या कारणाने गाजत आहेत. नेहमी कुणा साहित्यिकाला ह्या संस्थेचा पुरस्कार मिळाला, मग त्याचे कौतुक सुरू होते.. अलीकडल्या काळात हे पुरस्कार मिळण्यामुळे गाजावाजा होण्यापेक्षा तो मिळवलेल्या साहित्यिकांच्या राजकीय भूमिकेमुळे त्या पुरस्काराच्या बातम्या येत असतात. दोन वर्षापुर्वी त्याचा आरंभ अनंतमुर्ति नामक कन्नड साहित्यिकाने केला होता. नरेंद्र मोदी तेव्हा भाजपातर्फे पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून प्रचारार्थ फिरत होते आणि मोठमोठ्या सभा गाजवत होते. अशावेळी अनंतमुर्ति यांनी मोदींना अपशकुन करण्यासाठीच जाहिरपणे म्हटले, की मोदी पंतप्रधान झाले तर आपण देश सोडून निघून जाऊ! त्यांच्या या एका विधानानेच मागल्या कित्येक वर्षात कुणाला व कोणत्या कारणासाठी साहित्य अकादमी पुरस्कार दिले जात होते आणि त्यासाठी कुठली पात्रता तपासली जात होती; त्याची ग्वाही मिळालेली होती. किंबहुना सहा-सात दशकाच्या कालखंडात विविध संस्था कॉंग्रेस वा नेहरूंनी निर्माण केल्या असे म्हटले जाते, त्याचे पितळ त्यातूनच उघडे पडायला सुरूवात झालेली होती. नेहरू वा कॉंग्रेसच्या राजकीय विचारांचा गुणगौरव करणार्‍यांनाच समाजात मान्यता असावी वा मिळवून द्यावी, या दृष्टिने विविध संस्थांची निर्मिती झालेली होती. त्यांच्या साहित्यिक गुणवत्तेपेक्षा त्यांना आपल्या राजकीय निष्ठेचा पुरस्कार मिळावा, असेच या संस्थांचे स्वरूप राहिले. अर्थातच असल्या पुरस्कारांविषयी जनमानसात विश्वास निर्माण व्हावा, म्हणून काही तटस्थ कलाकार साहित्यिकांनाही असे पुरस्कार दिले जातात, पण अनेकांची गुणवत्ता खरोखरच काही ठराविक निकष लावून तपासली, तर त्यांना निव्वळ राजकीय निष्ठेपायीच असे पुरस्कार वाटले गेल्याचे आढळून येईल. किंबहुना त्यांच्यापेक्षाही गुणवान असलेल्यांना कसे खड्यासारखे राजकीय भूमिकेमुळेच बाजूला ठेवले गेले, त्याचीही साक्ष मिळू शकते.

आज जी साहित्य अकादमी पुरस्कार परत देण्याची मोहिम चालू झाली आहे, त्याकडे म्हणूनच कुठल्याही गुणवत्तेपेक्षा राजकीय भूमिकेतूनच बघितले पाहिजे. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येकाला आपापल्या राजकीय भूमिका व विचार घेऊन पुढे जाण्याची संधी असते. नरेंद्र मोदी वा त्यांच्या पक्षालाही तो अधिकार भारताच्या राज्यघटनेने दिलेला आहे. त्याच मार्गाने मोदी देशाचे पंतप्रधान होत असतील, तर त्याला मान्यता देण्याचे सौजन्य आपल्यापाशी नाही, असे जाहिरपणे अनंतमुर्ति सांगतात. त्यातून ते आपल्या असहिष्णू मानसिकतेची साक्ष देत नाहीत काय? अशा माणसाला मुळातच साहित्य पुरस्कार कशासाठी दिला गेला होता? साहित्यिक सेक्युलर असावा, तसा तो सहिष्णूही असायला नको काय? आपल्या विचार व भूमिकेच्या विरोधातली भूमिका असलेला माणुस त्याला शत्रूच भासू लागतो, तेव्हा तो माणूस लोकशाही मानतो असे म्हणता येईल काय? तिरस्काराची व द्वेषाची पराकोटी जाहिरपणे व्यक्त करणार्‍या माणसाकडून कोणते संस्कारक्षम साहित्य निर्माण झालेले असू शकते? त्याला कुठल्या कसोटीवर साहित्य अकादमीने पुरस्कार दिलेला होता? संघ वा भाजपाचा, त्यांच्या विचारांचा द्वेष हीच त्यासाठीची कसोटी नव्हती काय? लोकशाहीत विरोधक असतात, शत्रू नसतात. अनंतमुर्ति वा तत्सम लोकांनी लोकसभेचे मतदान सुरू व्हायच्या





आधीच आपल्या असहिष्णू वा द्वेषमूलक भूमिकेचा उद्‌घोष सुरू केला होता. मग अशा व्यक्तिंकडे लोकशाही समाजात प्रतिष्ठित वा मान्यवर म्हणुन बघण्यात तरी कितीसा अर्थ उरतो? विचार फक्त आपल्यापाशीच आहे आणि इतरांनी निमूटपणे तो मानला पाहिजे, त्यापेक्षा वेगळा बोलेल वा काही मांडेल, त्याला शत्रू ठरवणारी ही मानसिकताच लोकशाहीला धोकादायक असते. आज अनेकजण अनंतमुर्ति यांच्याच मार्गावर पुढले पाऊल टाकत आहेत. किंबहुना ते इतके दिवस गप्प कशाला होते, असा प्रश्न त्यांना विचारला पाहिजे.

साहित्य अकादमीचे विद्यमान अध्यक्ष विश्वनाथप्रसाद तिवारी यांनी या राजकीय नाट्याचा मुखवटा खेचून काढला आहे. शशी देशपांडे नामक साहित्यिकेने अकादमीचा पुरस्कार परत देत, त्या संस्थेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा असे आवाहन करताना तिवारी यांनी अकादमीचा जुना इतिहासच कथन केला आहे. त्यातून अशा नाराजीनाम्यांचा बुरखाच त्यांनी फाडला आहे. अकादमीने ताज्या घटनांविषयी मौन पाळले आहे, असा एक आक्षेप आहे. ताज्या घटना कुठल्या? दाभोळकर, पानसरेंची हत्याकांडे! अखलाक महंमदची जमावाकडून झालेली हत्या, अशा काही गोष्टी आहेत. त्यामुळे मुक्त विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचा आक्षेप आहे. त्याशिवाय देशातील सहिष्णूता कुंठीत होत असल्याचाही आरोप आहे. यापुर्वी असे काही या देशात घडलेले नव्हते का? १९७५ सालात तर अधिकृतरित्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी आणीबाणी लादून करण्यात आलेली होती. तेव्हा अकादमीने काय भूमिका घेतली होती? १९८४ सालात दिल्लीमध्ये शिखांचे सामुहिक हत्याकांड झाले. चारपाच हजार शिखांची जमावाने घरात घुसून हत्या केली वा जिवंत जाळण्याच्या घटना घडल्या होत्या. अजून त्यापैकी एकालाही शिक्षा होऊ शकलेली नाही. अखलाकपेक्षा ते हत्याकांड शतपटीने मोठे व भीषण होते. तेव्हा अकादमीने कशाचाही निषेध केला नाही. प्रत्येकवेळी साहित्य अकादमी मूग गिळून गप्प बसली होती. फक्त अकादमीच नव्हे, तर तिने पुरस्कार दिलेले तमाम 'लढवय्ये साहित्यिक' निमूट गप्प बसलेले होते. अनंतमुर्ति वा नयनतारा सहगल, शशी देशपांडे वा अशोक वाजपेयी असे एकाहून एक महायोद्धे, त्या घटनांच्या वेळी जन्माला आलेले नव्हते की त्यांच्या कोणी मुसक्या बांधून ठेवल्या होत्या? सहिष्णूतेची व्याख्या कळण्याचे त्यांचे तेव्हा वय नव्हते काय?

समाजात प्रतिष्ठीत मानले जाते, तेव्हा किती भंपकपणा खपवून घेतला जाईल, याचेही भान राखणे अगत्याचे असते. सामान्य माणसे तुम्हाला थोर वा प्रतिष्ठीत मानतात, म्हणजे तुम्ही जे काही बरळाल, तेच सत्य असे समजण्याचे कारण नाही. तसे असते तर अनंतमुर्ति, अमर्त्य सेन यांच्या शब्दाला मानून लोकांनी मोदींना इतके मोठे यश देवून सत्तेवर आणुन बसवले नसते! पण मागल्या दोन वर्षात ही प्रतिष्ठीत माणसे एकामागून एक स्वतःचेच वस्त्रहरण करून घेण्याची शर्यत करताना दिसत आहेत. आजवर ज्या विचार व तत्त्वांचा उदो उदो केला, त्यांच्याच कसोटीला उतरण्याची वेळ आल्यावर, प्रत्येकाचा पुरोगामी व बौद्धिक मुखवटा गळून पडत चालला आहे. सहिष्णूतेचा आव आणायचा आणि आपणच असहिष्णू कृती करायची, यापेक्षा दुसरा कुठला भंपकपणा असू शकतो. तिवारी सवाल करतात, त्याचे यापैकी एकातरी 'पुरस्कृत' साहित्यिकाकडे उत्तर आहे काय? आणीबाणी, शिखांचे हत्याकांड घडले तेव्हा यातले कितीजण साहित्य अकादमीचा 'आखाडा' करायला 'मी' म्हणत पुढे आले होते? नसतील तर कशाला गप्प बसले होते? की इंदिराजी वा कॉंग्रेसने गळचेपी केल्यास तेच स्वातंत्र्य असते? कॉंग्रेसजनांनी शिखांचे हत्याकांड केल्यावर त्याला पुरस्कृत भाषेत सहिष्णूता असे ठरवलेले आहे काय? नसेल तर आताच हा तमाशा कशासाठी आहे? पुरस्काराचे सर्व लाभ उठवून झाल्यावर तो 'परत करणे' म्हणजे तरी नेमके काय असते? त्याचे प्रमाणपत्र वा पदक इतकेच त्याचे महत्त्व असते का? तुमच्या लिखाणाचे अनुवाद भारतीय भाषांमध्ये छापून वितरीत करण्यावर सरकारी खर्च झाला त्याचे काय? सामान्य जनतेच्या पैशातून स्वस्तात ते लिखाण विकण्याचा भुर्दंड कोणी भरून द्यायचा? हाच नेहरूवाद वा त्यातून मिळालेली वतनदारी आहे. तिला शह मिळाल्याने बिथरलेली जमात साहित्याचाही आखाडा बनवू लागली आहे, इतकाच सध्याचा मोहिमेचा अर्थ आहे.

■ भाऊ तोरसेकर
भ्रमणध्वनी : ९७०२१३४६२४

# ये कहाँ आ गये हम?

***मी*** असतो राहायला कोकणात. मूळगावी कधीतरी जावंसं वाटतं. मुंबईतलं गोरेगाव मला खुणावतं, बोलावतं. रसाळ बालपण आणि मधाळ तारुण्य जिथं मस्त मजेत घालवलं, ती मुंबई 'ये रे कधी-तरी' म्हणते... पण जाऊन बघावं, तर माझंच गाव मला ओळखता येत नाही. मराठीपण शोधून गावत नाही.

एकेकाळी हे गोरेगाव बुद्धिवाद्यांचं, समाजवाद्यांचं, लेखक-कवींचं, महानगरपालिकेच्या पहाडी शाळांचं, झाडामाडांचं, मालवणी हेलांचं, रांगड्या मऱ्हाटी बोलांचं होतं.

'पाणीवाली बाई' मृणाल गोरेंनी बाईमाणसाच्या अंगातलं पाणी गोरगरीब जनतेची बाजू घेऊन दाखवलेलं होतं. अनेक लेखन पुरस्कार मिळवणाऱ्या प्रसिध्द कथा-कादंबरीकार वसुधा पाटील या आमच्या मराठीच्या खमक्या शिक्षिका होत्या. पूरकरवाडी, सामंतवाडी, नाईकवाडी, पांडुरंगवाडी, गोगटेवाडी असं वाड्यांचं आणि वाडवडिलांचं राज्य होतं.



आजच्या टॉवरटॉल सोसायट्यांच्या, मॉल आणि मालामाल लोकांच्या बिगरमराठी साम्राज्यात मला, साध्या मराठी माणसाला माझ्याच जन्मगावात 'स्पेस' राहिली नाही. हे आपण कुठे आलो आहोत? असं परकं, पोरकं वाटून गांगरुन जायला होतं. पटकन कुणीही 'घाटी' म्हणेल, अपमान करेल असं मनात येतं. मराठी माणसाच्या बाजूने कोण आहे? प्रश्न तसाच आहे. उत्तर मिळालेलं नाही.

गावातल्या प्राथमिक शाळेनं जरा धीर दिला. शाळेचं नावच 'आशाताई गवाणकर प्राथमिक शाळा' असं आहे. आईने बालवाडीपासून १९५० मध्ये त्या संस्थेची सुरुवात केली. शाळेसाठी रक्त आटवलं. संस्थापक-मुख्याध्यापिकेची नाममुद्रा शाळेवर उमटावी हे एक चंदन उगाळल्यासारखं समाधान आहे. आईची अमर बालगीतं, बडबडगाणी त्या शाळेतली छोटी, बोबडी बालकं म्हणून दाखवतात. बाकी बरीचशी गावामध्ये अमेरिका अवतरली आहे. मी तर एकदा रस्ताही चुकलो. सामंत नावाची माझी मामी मला हसत म्हणाली, असा कसा रस्ता चुकलास? मी म्हटलं, अग, किती बदललं हे जयप्रकाशनगर! मला कुठून कुठे जावं कळेचना. मग मामीने मस्तपैकी पापलेट तळून खायला घातलं व म्हणाली, आता यापुढे जिथून तळलेल्या पापलेटचा सुगंध येईल त्या रस्त्याने ये. मामाचं घर सापडेल.

एकूणच मराठी माणसाने बहुतांशी मुंबई गमावली हे खरंय! पैसा हाच देव झाला. माणसांना काही 'चेहरा'च राहिला नाही. केवळ 'स्टंटबाजी' करुन तो परत कसा मिळणार? दोन मराठी तरुणही एकमेकांशी हिंदीत 'फैशन' म्हणून बोलायला लागले. घरातली बोलीभाषा इंग्रजी झाली. आकाशवाणीचं मुंबई केंद्र अडगळीत पडलं. मुंबईकरांचं चुकलंच. मग मी एखादा रस्ता चुकलो तर काय झाल ग मामी?

■ माधव गवाणकर
मु .पो. ता. दापोली, जि. रत्नागिरी
४१५७१२

# पिरंगुटच्या सरपंचपदी ललिता पवळे यांची बिनविरोध निवड



**पिरंगुट, (वार्ताहर) :** मुळशी तालुक्याची औद्योगिकनगरी असलेल्या पिरंगुट ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ललिता दामोदर पवळे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

पिरंगुट ग्रामपंचायतीच्या सरपंच सुरेखा पवळे यांनी ठरल्याप्रमीणे राजीनामा दिल्याने हे पद रिक्त होते. मंगळवारी झालेल्या सरपंचपदाच्या निवडणुकीत ललिता पवळे यांचा एकमेव अर्ज आला होता. त्यामुळे पवळे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडल अधिकारी बी. व्ही. शेंडगे यांनी जाहीर केले. याकामी तलाठी एस. एस. निंबाळकर यांनी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी मावळत्या सरपंच सुरेखा पवळे, उपसरपंच ज्ञानेश्वर पवळे यांनी त्यांचे अभिनंदन केले. माजी उपसरपंच, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ वाघ, ग्रामविकास अधिकारी सोमनाथ नवले, सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सरपंच निवडीनंतर पवळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

ललिता पवळे यांची सरपंचपदी निवड झाल्याबद्दल माजी आदर्श सरपंच बाळासाहेब गोळे, माजी सभापती बाळासाहेब पवळे, मुळशीच्या उपसभापती सविता पवळे, माजी सरपंच भीमराव गोळे, पोलीस पाटील प्रकाश पवळे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष चांगदेव पवळे, तंटामुक्ती अध्यक्ष भानुदास गोळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पिरंगुटमध्ये झपाट्याने नागरिकीकरण वाढत आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, सुरळित पाणीपुरवठा व सोयीसुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित सरपंच ललिता पवळे निवडीनंतर सांगितले.

# बीएसएनएलच्या व्हाटस् ॲप ग्रुपकडून दुष्काळग्रस्तांना दीड लाख

**पुणे, (प्रतिनिधी) :** बीएसएनएल या सरकारी कंपनीचे जाळे भारताच्या कानाकोपऱ्यात पसरलेले असून ग्रामीण जनतेला विविध सेवा पुरवण्यात बीएसएनएल कायमच अग्रेसर राहिले आहे. देशावर कोसळलेल्या नैसर्गिक संकटाच्या वेळी बीएसएनएल धावून जाते. काश्मीरमधील पूर, लेहचा भूकंप तसेच उत्तराखंडच्या संकटावेळी याचा प्रत्यय आला आहे. बीएसएनएलच्या महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून दीड लाख




रूपये गोळा करून दिले आहेत.


नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या 'नाम' या संस्थेच्या खात्यावर हा निधी भरण्यात आला. बीएसएनएलच्या महाराष्ट्राच्या विविध भागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचा व्हाटस ॲप ग्रुप आहे. या ग्रुपचा प्रभावी वापर करत सदस्यांनी १५ ते २० दिवसात ही रक्कम जमा केली.

व्हाटस ॲप ग्रुपचा वापर केवळ मनोरंजनासाठी किंवा द्वेष पसरविण्यासाठी केला जातो, असे चित्र असताना बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांनी हा आदर्श निर्माण केला आहे. सामाजिक भान आणि आपल्या शेतकरी बांधवांबद्दलची जाणीव लक्षात ठेऊन इतर ग्रुपनीही असे उपक्रम राबवावेत, असे आवाहन ग्रुपच्या सदस्यांनी केले आहे.

# होली एंजल्स चर्चची शताब्दी उत्साहात साजरी

**पुणे, (प्रतिनिधी) :** रास्ता पेठमधील होली एंजल्स चर्चची शताब्दी उत्साहात साजरी करण्यात आली. या शताब्दीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी सामुहिक प्रार्थना गीते गाण्यात आली. यावेळी सी. एन. आयचे डेप्युटी मॉडरेटर मोस्ट राईट रेव्ह. पी. एस. सिंग, पुणे धर्मप्रांतचे बिशप राईट रेव्ह. अन्डरू राठोड, होली एंजल्स चर्चचे पाळक रेव्ह देवदान मकासरे, प्रमुख पाहुणे म्हणून पद्मभूषण चंदू बोर्डे, सुरेंद्र मोहिते, गझलकार रमण रणदिवे, चर्चचे सचिव ॲड. मदनमोहन ठाकोर, खजिनदार विलास बोर्डे, सहसचिव दीपा खंडागळे, सहाय्यक खजिनदार रवींद्र पाटोळे, पराग खंडागळे, संतोष



सोज्वळ, अरुणा पवार, मनाली साळवे, नलिनी चंदनशिव, सरला बारसे, रमाकांत सदरगीरे, रजनीकांत बनकर, प्रकाश उजगरे, प्रभाकर शेकटकर आदी मान्यवर आणि ख्रिस्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शताब्दी वर्ष पूर्तीनिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले तसेच चर्चच्या सर्व पाळकांना शाल, पुष्पगुछ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

उपस्थितांचे स्वागत पुणे धर्मप्रांतचे बिशप राईट रेव्ह अन्डरू राठोड यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. अमित त्रिभुवन यांनी केले. आभार चर्चचे सचिव ॲड. मदनमोहन ठाकोर यांनी मानले.

## गोवंश हत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी करण्याचा लवळे ग्रामपंचायतचा ठराव

**लवळे, (वार्ताहर) :** गोवंश हत्या बंदी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ व सुधारित २००५ व २०१५ नुसार लवळे ग्रामपंचायतीने १०० टक्के गोवंश हत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला . या कायद्याचे पालन करण्यासाठी ग्रामपंचायत परिसरातील गोवंशधन कोणी कत्तलीसाठी कसायांना विकू नये असा ग्रामपंचायतने ठराव केला.

लवळे येथे रोटमलनाथ मंदिरात लवळे ग्रामपंचायतची ग्रामसभा नुकतीच संपन्न झाली. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी लवळे ग्रामपंचायतीच्या सरपंच वैशाली सातव, उपसरपंच सर्जेराव तागडे, ग्रामविकास अधिकारी टी. व्ही. रायकर, ग्रामपंचायतचे सदस्य उपस्थित होते.

## साहित्यिक पुरस्कारांसाठी पुस्तके पाठविण्याचे आवाहन

**गुहागर, (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा गुहागरच्या वतीने यावर्षापासून कै. प्रमिला आरेकर यांच्या स्मरणार्थ पुढीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येत आहेत.

कै प्रमिला आरेकर राज्यस्तरीय कादंबरी पुरस्कार. स्वरूप– रोख रक्कम २५००/– शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह. कै. प्रमिला आरेकर राज्यस्तरीय कथा पुरस्कार. स्वरूप– रोख रक्कम २५००/– शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह. कै. प्रमिला आरेकर राज्यस्तरीय काव्य पुरस्कार. स्वरूप– रोख रक्कम २५००/– शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह.

तिन्ही पुरस्कार स्वतंत्र समित्यांकडून निपक्षपातीपणे निवडण्यात येतील व त्यांचे वितरण शाखेच्या वर्धापनदिन सोहळ्यात मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते करण्यात येईल. तरी साहित्यिक व प्रकाशकांनी दि. ३१ मार्च २०१४ ते १ एप्रिल २०१५ दरम्यान प्रकाशित झालेले आपले साहित्य १० नोव्हेंबर २०१५ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा– गुहागर, हॉटेल श्रीपुजा, दुसरा मजला, बाजारपेठ, गुहागर जि. रत्नागिरी. ४१५७०३ चलभाष– ९४२२६२७२७३/९४०४१६११८०

# ‘सप्तरंग’कडून सातारकरांना दर्जेदार नाटकांची मेजवानी : प्रशांत दामले

## ■ प्रशांत दामले व तेजश्री प्रधान यांचा सत्कार

**सातारा, (प्रतिनिधी) :** दूरदर्शन वाहिन्या व इतर प्रलोभनातून आपण खास वेळ काढून नाटक पहायला, आमची कलाकृती पाहायला वेळ देत आहात याचे सर्व श्रेय सप्तरंग या नाट्य रसिक परिवार योजना राबविणाऱ्या संस्थेला जाते. या ठिकाणी खास आपल्यासारख्या रसिक प्रेक्षकांसाठी ही संस्था तब्बल ६ वर्षे असे उपक्रम राबवत आपणाला दर्जेदार नाटकांची मेजवानी देत आहे ही मोठी कौतुकाची बाब आहे, असे उद्गार ज्येष्ठ चित्रपट व नाट्य अभिनेते प्रशांत दामले यांनी काढले.

येथील सप्तरंग संस्था आयोजित नाट्य रसिक परिवार योजनेच्या सातव्या वर्षातील पहिल्या कार्यक्रमात वसंत सबनीस लिखित ‘कार्टी काळजात घुसली’ हे मराठी नाटक सादर झाले. यावेळी या नाटकातील सर्व कलाकारांसह ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले व जान्हवी फेम तेजश्री प्रधान यांचा सप्तरंगतर्फे सत्कार करण्यात आला. मध्यंतरात निवासी उपजिल्हाधिकारी संजीव देशमुख, उपजिल्हाधिकारी प्रवीण यादव व मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले.

प्रेक्षकांशी संवाद साधताना प्रशांत दामले म्हणाले, असे उपक्रम यशस्वी करण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत, कष्ट हे मोठे त्रासाचे काम आहे. आपण रसिक प्रेक्षक या उपक्रमाला भरभरून दाद देत असल्यामुळे सप्तरंगसारख्या संस्थेला असे कार्यक्रम साताऱ्यात आयोजित करणे शक्य होत आहे. आम्हा कलाकारांना बाहेरगावी प्रयोग करायचे झाल्यास सातारा, कराड, सांगली, कोल्हापूर असा दौरा करणे सोयीचे असते. त्याकरता सप्तरंगसारख्या संस्था असणे आवश्यक आहे.

तेजश्री प्रधान म्हणाल्या, सप्तरंगचे कार्य जणू इंद्रधनुष्यासम– रखे आहे. आज सात वर्ष नाट्यप्रेमींसाठी सुरू झालेली चळवळ अशीच बहरत जावो.

उपजिल्हाधिकारी संजीव देशमुख व नुतन मुख्याधिकारी नितीन पाटील यांच्या हस्ते नटराज पूजन झाले. ज्या रसिकांनी हे नाटक पाहण्यासाठी देणगी प्रवेशिका घेतली असेल त्यांना संस्थेचे सभासद होण्याची




संधी आहे. तुम्ही घेतलेल्या देणगी प्रवेशिकेची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम भरून आपल्याला सभासद होता येईल. वर्षभर दर्जेदार नाटकांचा आस्वाद घेण्यासाठी सभासद होण्याचे आवाहन सप्तरंगतर्फे करण्यात आले आहे.

प्रास्ताविक करताना सप्तरंगचे सुजय जोशी म्हणाले, दर्जेदार नाटके, ख्यातकीर्त कलाकार, उत्तमोत्तम विषयांचे सादरीकरण करणाऱ्या योग्य व अचूक नाटकांची निवड ही सप्तरंगची खासियत आहे.

‘चपराक’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : ‘चपराक’, ६१७, ‘साईकृपा’, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com